# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १७/०५/२०२४ (शुक्रवार) सकाळ**

---

**अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीस अटक**

**वाहनासह एकुण ४०,७०,०००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त**

**नागपूर ग्रामीण विशेष पथकाची कारवाई**

दिनांक १७/०५/२०२४ रोजी मा. पोलीस अधिक्षक यांचे विशेष पथकातील स्टाफ पोस्टे अरोली हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना गोपनीय सूत्रधाराकडून माहीती मिळाली की, तुमसर कडुन मनसरकडे एक लाइन ट्रक वाहन अवैधरीत्या विनापरवाना रेती लोड करून नागपूर कडे वाहतुक करीता येत आहे. अशा खात्रीशीर बातमीवरून अरोली हद्दीतील किरणापुर बस स्टॉप जवळ अवैध रेती संबंधाने अचानक नाकाबंदी करून १६ चक्का लाइन ट्रक क्र. एम. एच—४०/सी. टी.—४१९८ चा चालक **आरोपी नामे— प्रफुल बालकृष्ण सोनगडे, वय २३ वर्ष, रा. ग्राम सुकली ता. तिरोडी जि. बालाघाट (म.प्र.)** याचे वाहनास स्टाफने थांबवून पाहणी केली असता वाहनामध्ये अंदाजे १४ ब्रास रेती मिळून आल्याने सदर ट्रक चालकास ट्रक मधील रेतीचे रॉयल्टी बाबत विचारले असता रॉयल्टी नसल्याचे सांगितल्याने व सदरची रेती ही चोरीची असल्याची खात्री झाल्याने आरोपीच्या ताब्यातून १६ चक्का लाइन ट्रक क्र. एम. एच—४०/सी. टी.—४१९८ किंमती ४०,००,०००/—रू. मध्ये १४ ब्रास रेती किंमती प्रत्येकी ब्रास ५०००/—रू. प्रमाणे ७०,०००/—रू. असा एकुण वाहनासह ४०,७०,०००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त करून **आरोपी नामे— १) प्रफुल बालकृष्ण सोनगडे, वय २३ वर्ष, रा. ग्राम सुकली ता. तिरोडी जि. बालाघाट (म.प्र.) मालक नामे— २) महादेव दयाराम पारधी, रा. देवलापार ता. रामटेक जि. नागपूर** यांचेविरुद्ध पोस्टे अरोली येथे कलम ३७९, १०९, ३४ भा.द. वी. सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमिन महसूल संहिता, सहकलम २१, ०४ खाणी आणि खनिजे अधिनियम १९५७ सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंधक अधि. १९८४ अन्वये पो. स्टे. अरोली येथे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक श्री. किशोर शेरकी, पोना प्रणय बनाफर, पोलीस अंमलदार कार्तिक पुरी, बालाजी बारगुले विशेष पथक नागपूर ग्रामीण यांनी केली.




## <u>मंदीरात चोरी करणारा आरोपी अटकेत</u>

पोस्टे कन्हान अंतर्गत बालाजी देवस्थान डुमरी येथे दिनांक १६/०४/२०२४ चे ०८.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे– महेश प्यारेलाल राय, वय ५४ वर्ष, रा. बालाजी देवस्थान डुमरी हे बालाजी देवस्थान येथील १३ वर्षा पासुन चेअरमॅन असुन मंदीराचे परीसरात राहतात व मंदीराचे काम बघतात. मंदिराचे सुरक्षा करीता १) राजेश खैरे, २) संतोष अजबले ३) श्रीकांत कमाले हे जुने सिक्युरीटी गार्ड आहे. श्रीकांत कमाले यांनी मनोज रघुपती पिल्ले, वय ४० वर्ष, रा. निर्मल कॉलनी जरीपटका नागपुर यांना सिक्युरीटी गार्ड म्हणुन दि. ०४/०५/२०२४ रोजी आणले तेव्हा फिर्यादीने त्यांचे आधार कार्ड बघुन त्यांना सिक्युरीटी गार्ड डयुटीवर ठेवले. दि. १६/५/२४ रोजी श्रीकांत कमाले यांनी फिर्यादीला फोन करून मंदीरात बोलविले श्रीकांत कमालेने आपला मोबाईल मनोज याला पत्नी सोबत बोलायला दिला. श्रीकांत कमालेनी फोनची रेकॉर्डीग केली फिर्यादीला ऐकवली मनोज पिल्लेने त्याच्या पत्नीस म्हटले की, ''मै बालाजी पुरम मंदिर मे काम करता हु और मेरे मालीक को मुझपे बहोत भरोसा है, अब मै मंदीरमे कुछ बडा काम करनेवाला हु'' असे ऐकल्यावर फिर्यादीला त्याचेवर संशय झाला तेव्हा मंदिर चेक केले असता बाथरूम मधील स्टीलचा नळ व तिन नोजल किंमती ४०००/– रू. चे चोरून नेले आहे.

सदर गुन्हयातील आरोपीचा शोध कन्हान पोलीस घेत असता मिळालेल्या गोपनीय माहिती नुसार **आरोपी नामे– मनोज रघुपती पिल्ले, वय ४० वर्ष, रा. निर्मल कॉलनी जरीपटका नागपुर** यास त्याचे राहते घरून ताब्यात घेवुन त्याचे घराची घरझडती घेतली असता आरोपीचे ताब्यातून मंदीरातील बाथरूम मधील चोरीस गेलेला स्टीलचे नळ व ३ नोजल

किंमती ४०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. सदर मुद्देमालाबाबत आरोपीस विचारपुस केली असता त्याने चोरीचा गुन्हा केल्याची कबुली दिली असुन आरोपीला अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार सुर्यभान जळते हे करीत आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे कन्हान येथील ठाणेदार पोलीस निरीक्षक उमेश पाटील, सफौ सुर्यभान जळते यांनी पार पाडली.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**